# ऋणनिर्देश

शब्द आणि वाणी यांचा सुंदर मिलाफ म्हणजेच वक्तृत्व. शब्दांची जुळवाजुळव आणि त्यांची लयबध्द शब्दफेक याला भाषण असेही म्हणतात. यशवंतरावांच्या भाषणांचा अभ्यास करताना मला निस्सिम आनंद व समाधान झाले. प्रबंधिका पूर्ण करण्यास ज्यांचा हातभार व सहकार्य लाभले त्यांच्या ऋणातून मी मुक्त होईन असे वाटत नाही. तरीही ही औपचारिकता आवश्यकच आहे.

प्रत्येक प्रबंधिका ही अभ्यासकाबरोबर मार्गदर्शकाच्याही कौशल्याचा एक भाग असते. माझ्या मार्गदर्शिका प्रा. डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी, मराठी विभाग प्रमुख, भारती विद्यापीठाचे, कन्या महाविद्यालय, कडेगांव, जि. सांगली यांच्या उत्तम आणि योग्य मार्गदर्शनामुळेच मला या प्रबंधिकेच्या परीश्रमाला योग्य दिशा मिळाली त्यांचे आभार मानणे हे माझे आद्य कर्तव्य आहे.

आपल्या सवंग ज्ञानाचा उपयोग नेहमीच इतरांना करून देणारे व अभ्यासक्रमाला प्रवेश देण्यापासून ते प्रबंधिका पूर्ण होईपर्यंत त्याकडे सतत काळजीने लक्ष देणारे आदरणीय प्रा.डॉ. कन्हैया कुंदप, माजी मराठी विभाग प्रमुख, सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड आणि कार्यकारी संपादक, विचार भारती, पुणे यांची मी शतशः ऋणी राहीन. त्यांनी वेळोवेळी माझ्या मनाला उभारी दिली आणि निरपेक्ष मार्गदर्शन केले.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांना जवळून ओळखणारे, चव्हाण साहेबांच्या आठवणी सांगताना गतकाळात रमून जाणारे आदरणीय विठ्ठलराव पाटील, माजी ग्रंथपाल व कार्यवाह, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक, कराड यांची मी मन:पूर्वक आभारी आहे. चव्हाण साहेबांच्या विषयी माहितीचे भांडार त्यांनी मला प्रत्येक वेळी उपलब्ध करून दिले आणि योग्य त्या सूचना केल्या.

याबरोबरच सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडचे ग्रंथपाल, कराड नगर वाचनालयाचे ग्रंथपाल, कन्या महाविद्यालय, इस्लामपूरच्या ग्रंथपाल यांनी मला वेळोवेळी पुस्तके उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे मी आभार मानते.

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूरचे प्रा. अनिल पाटील, कन्या महाविद्यालय, इस्लामपूरचे प्रा.प्रदीप पाटील, प्रा. डॉ. दीपा देशपांडे, माझे सर्व शिक्षक सहकारी यांच्यामुळे माझ्या कार्यास सतत प्रेरणा मिळाली त्यांचेही आभार.

माझ्या संपूर्ण अभ्यासकार्याचे श्रेय मी माझे पती प्रा. दीपक पाटील यांना देते. प्रवेश घेण्यापासून प्रबंधिका सादर करेपर्यंत प्रत्येकवेळी मला मानसिक आधार दिला. त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आणि सहकार्यामुळेच मी ही प्रबंधिका पूर्ण करू शकले. माझा मुलगा चि. प्रणव याने "आई, अभ्यास कर, मी खेळतो." अशा बोबड्या शब्दात मला बरेचदः सांगितले व माझ्या अभ्यासात व्यत्यय न आणता वेळ उपलब्ध करून दिला त्याचेही आभार. माझी बहिण कु. सविता साळुंखे हिने माझ्यासाठी तिचा वेळ व सहकार्य केले याबद्दल तिचे आभार मानणे महत्त्वाचे आहे.

मला स्फुर्ती देणारी ती. आई व ती. वडील, माझे सासरे कै. आर.ए. पाटील, माझ्या सासुबाई या सर्वांचे आशीर्वाद हे माझ्या अभ्यासामागील प्रेरणास्त्रोत आहेत. माझा भाऊ, माझे दिर, जाऊबाई, नणंद या सर्वांनी मला अभ्यासास वेळ दिला व सहकार्य केले.

मला स्नेहपूर्ण मदत करणारे श्री चंद्रकांत देशमुख, सौ. रंगुबाई देशमाने, सौ. इंदूबाई सगर यांची मी आभारी आहे.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्यावर लेखन केलेल्या सर्व लेखकांचे अप्रत्यक्षरित्या मला सहाय्य मिळाले. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे उत्कृष्ट टंकलेखनाबद्दल सौ. ज्योती नांदेडकर, ज्योती टायपिंग, कराड, संदीप झेरॉक्स, कराड व दत्तप्रसाद प्रिंटींग प्रेस, कराड, श्री. अवधूत बिचकर, श्रीराम कॉपीअर्स, कराड या सर्वांनीच आपापल्या परीने मला मदत केली याबद्दल त्यांचे आभार.

तसेच ही प्रबंधिका पूर्णत्वास नेण्यास ज्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य मला लाभले त्या सर्वांचीच मी शतशः ऋणी आहे.

कु. सुनीता उत्तमराव साळुंखे